**उस्मानाबाद जिल्हयातील परंडा, तालुक्यातील प्रस्तावित १० वाळुघाटा बाबतच्या दि ३१.०१.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

उस्मानाबाद जिल्हयातील परंडा, या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या १० वाळुघाटांकरीता दि ३१.०१.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. ३१ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे घेणेकरीता मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, सायन, मुंबई यांचे आदेश क्रं ०७ दि. २४/०१/२०२२ अन्वये खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद तथा जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद | -- | अध्यक्ष |
| २. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | -- | सदस्य |
| ३. उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र.नि. मंडळ, लातूर. | -- | समन्वयक |

मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद तथा समिती अध्यक्ष यांच्या मान्यतेने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, लातूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरणप्रेमी गट, स्थानिक व इतर प्रतिनिधी यांचे हार्दिक स्वागत केले. समिती समन्वयक यांनी पुढे सांगितले की, या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीची सुचना भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया ३० दिवस आधी दि. २९.१२.२०२१ रोजी देण्यात आली होती.

तसेच प्रस्तावित १० वाळु घाटासंबंधीत वाळु उत्खननाच्या पर्यावरण व्यवस्थापन आराखाडाचा मसुदा कार्यकारी सारांश इंग्रजी व मराठी भाषेतील प्रती भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता विविध शासकिय कार्यालय तथा स्थानिक ग्रामपंचायत येथे सुचना/हरकती ई-मेल किंवा लेखी स्वरूपात देण्याबाबतचे आवाहन/जाहीर प्रकटन ३० दिवस आधी केले होते. सदील जाहीर प्रकटनाच्या अनुषंगाने या कार्यालयास एकही निवेदन प्राप्त झाले नाही.

तदनंतर समिती समन्वयक यांनी प्रकल्प धारकास विनंती केली की त्यांनी या प्रस्तावित १० वाळु घाटासंबंधीची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तवाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीचे सादरीकरण करावे.

प्रकल्प धारकानी सदरील प्रकल्प व पर्यावरण मुद्याविषयाबाबतचे खालील प्रमाणे सविस्तर सादरीकरण केले

- **लिलावाकरीता पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याकरीता प्रस्तावित वाळु घाटांची खालील यादी**

| | तालुका | वाळु घाट | नदी/ नाला | घाटाची [illegible] मी | क्षेत्र हेक्टर मध्ये | वाळु [illegible] | हातची किंमत रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परंडा | जाकेपिंपरी, | उल्फा | ५००x२५x०.५० | १.२५ | २२०८ | १३२४८०० |
| २ | परंडा | रूई- दुधी, | उल्फा | ८२०x१३x१ | १.०७ | ३७६७ | २२६०२०० |
| ३ | परंडा | वाटेफळ/इनगोंदा/ हिंगणगाव.खु, | नळी | १६००x१०x१ | १.६० | ५६५४ | ३३९२४०० |
| ४ | परंडा | शेळगाव, | निम्न खैरी | ७००x२०x१ | १.४० | ४९४७ | २९६८२०० |
| ५ | परंडा | देउळगाव, | खैरी | ७००x१५x१ | १.०५ | ३७१० | २२२६००० |
| ६ | परंडा | तांदुळवाडी, | खैरी | २०००x१५x१ | ३.० | १०६०० | ६३६०००० |
| ७ | परंडा | जगदाळवाडी, | खैरी | १०००x१५x१ | १.५० | ५३०० | ३१८०००० |
| ८ | परंडा | पारेवाडी, | नळी | ७००x१५x१ | १.०५ | ३७१० | २२२६००० |
| ९ | परंडा | हिंगणगाव.बु, | चांदणी | ८००x१३x०.५ | १.०४ | १८३७ | ११०२२०० |
| १० | परंडा | ढगपिंपरी. | चांदणी | ६००x२०x०.५ | १.२० | २१२० | १२९२००० |

- **अनुमती/परवानग्या व गोषवारा :**

| | |
|---|---|
| प्रकल्प प्रवर्तक | जिल्हा खनिकर्म अधिकारी उस्मानाबाद |
| प्रकल्प स्थिती | नवीन, प्रस्तावित वाळु घाट |
| उत्खनन करावयाचे खनिज | वाळु/वाळु (बांधकाम योग्य) |
| वाळुघाट प्रस्तावित करणारी समिती | मा. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या व भुवैज्ञानिक, म. प्र. नि. मंडळ यांचे प्रतिनीधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनीधी असलेल्या तालुका तांत्रिक समिती |
| ग्रामपंचायत ना हरकत | ग्रामपंचायतींकडून वाळु निर्मितीच्या धोणानुसार प्राप्त |
| उत्खननाकरीता ठरवून दिलेला कालावधी | दि १० जुन ते ३० सप्टेंबर पर्यंतचा मान्सुन कालावधी वगळता जास्तीत जास्त ०१ वर्ष. |

- **उत्खनन पध्दत :**

वाळु उत्खनन टोपले, पावडेद्वारे मजुरांकरवी करण्याचे प्रस्तावित आहे.

अ. मातीचे ढिगारा किंवा मातीचे उत्खनन करता येणार नाही.

ब. वाळु उत्खनन टोपले, फावडेद्वारे मजुरांकरवी करण्याचे प्रस्तावित आहे.

क. उचललेली वाळु ट्रॅक्टरद्वारे वाहण्याचे प्रस्तावित आहे.

ड. ट्रॅक्टर वगळता कोणतीही अवजड व यांत्रिकी मशीनरी उपयोगात आणता येणार नाही.

इ. उत्खननाकरीता ठरवून दिलेल्या कालावधी हा दि १० जुन ते ३० सप्टेंबर पर्यंतचा मान्सुन कालावधी वगळता जास्तीत जास्त १ वर्षाकरीता प्रस्तावित आहे.

- **वायु प्रदुषण उपाय योजना :**

| अ. क्रं | प्रदुषणाचे स्त्रोत | अपेक्षित परीणाम | व्यवस्थापन योजना |
|---|---|---|---|
| १ | ट्रान्सपोर्ट रोड/वाळु वाहन मार्ग | हवा गुणवत्ता/जमीन रास्ता मजबुती रस्त्याचा ऱ्हास | • वाहन मार्गाचे मजबुती करण<br>• वाहन मार्गाचे देखभाल<br>• ट्रॅक्टर मध्ये मान्यताप्राप्त क्षमतेनुसार खनिज वहन करण्यास प्रतिबंध<br>• उत्खनन कालावधी दरम्यान हवा दर्जा तपासणी |
| २ | ट्रक/ट्रॅक्टर यांचे चलन | हवा दर्जा/गुणवत्ता | • मान्यता प्राप्त क्षमतेपेक्षा ट्रॅक्टर मध्ये खनिज भरणे व वहन करण्यास प्रतिबंध<br>• वाळु वाहन करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीज ताडपत्री झाकून वाहतूक करणे.<br>• वाहनांचा गती नियंत्रक बसविणे.<br>• वाळु घाटावर वाळु ट्रॅक्टर मध्ये भरताना इंजिन बंद ठेवणे.<br>• रस्त्यावर पाणी टाकणे. |
| ३ | वाळु घाट व वाळु घाट मार्ग | उत्खनन प्रक्रिया | • वाळुघाट होलेज मार्गाची वारंवार दुरूस्ती व देखभाल<br>• कामगारांना डस्ट मास्क देणे.<br>• वाळु उत्खनन व वहन दिवसाचं करणे |
| ४ | नदी किनाऱ्याचे व्यवस्थापन | नदी किनाऱ्याची झीज पुर रेषा व्यवस्थापन | • नदी किनाऱ्यावर झाडे लावणे<br>• नदी किनाऱ्यांच्या उतारावर हिरवळ(ग्रास) लावणे.<br>• बांबू लागवड करणे. |

- **व्यवसाय, आरोग्य व सेवा योजना :**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | धुळ कण श्वसन विषयी व्यवसाय सुरक्षितता, आरोग्य व सेवा योजना | कामगारांची सुरक्षितता व उत्खनन | • कामगारांची पर्यावरण पुरक व सुरक्षित वातावरण तयार करणे.<br>• असे वातावरण व उपाययोजना अंमल बजावणीसाठी मान्यता प्राप्त निविदाधारक/ठेकेदार उपाययोजना करेल.<br>• कामगारांना वैयक्तिक संरक्षण उपकरणे देण्याचे प्रस्तावित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • कामगारांना आवश्यक प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.<br>• प्रथोमपचार पेटी, पिण्या योग्य पाणी, तात्पुरत्या निवाऱ्याची सोय करण्याचे प्रस्तावित. |

- **ध्वनी प्रदुषण उपाययोजना :**

- कामगारांना कान बुचे देण्याचे प्रस्तावित आहे
- ट्रॅक्टर/ट्रक व्यतीरीक्त कोणत्याही ध्वनी प्रदुषण करणाऱ्या मशीनरी प्रतिबंधित आहेत.
- ट्रॅक्टर चे इंजिने वाळुघाटावर वाळु भरते वेळेस बंद ठेवण्यात येईल
- कामगारांची आरोग्य विषयक तपासणी करण्यात येईल.
- कामगारांना व अभ्यंगताना वैयक्तिक संरक्षक उपकरणे देण्यात येईल.

- **वाहतुक व्यवस्थापन :**

- खनिज वाहतुक करणारे वाहन फॉरेस्ट व महसुल विभागाकडे नोंदणीकृत करणे प्रस्तावित आहे.
- अश्या सर्व वाहनाकडे प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र असण्याचे बंधनकारक असेल.
- अशी सर्व वाहने ध्वनी उत्सर्जन व धुळ/इतर उत्सर्जन संबंधी प्रमाणकाद्वारे उच्च प्रतीच्या देखभाली खाली प्रमाणीत असतील
- असे सर्व वाहनचालक वाहतुकीसंबंधी नियमांचे पालन करण्यास बाध्य असतील.
- अश्या सर्व वाहनांची गती नियंत्रित केलेली असेल.
- क्षमतेपेक्षा जास्त खनिजाचे वाहन करता येणार नाही.
- खनिज वाहन करणाऱ्या वाहनांचे खनिज ताडपत्री (टरपोलिन) ने झाकण्याचे प्रस्तावित आहे.
- इतर वाळु ठेकेदारांसोबत समन्वय साधुन वाळुचे वाहन करण्याचे प्रस्तावित आहे जेणेकरून वाहतुकीचा खोळंबा होणार नाही.
- **वृक्षारोपण कार्यक्रम :**

- मान्सुन दरम्यान (दि १० जुन ते ३० सप्टेंबर) नदी किनाऱ्यांवर व वाहन मार्गावर झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे.
- नीम, पिंपळ, करंजी, बांबू, अशी स्थानिक झाडे लाावण्याचे प्रस्तावित आहे.
- मान्य निविदाधारक/वाळु ठेकेदार ह्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेचे टेबल क्रमांक १ अनुसार दिलेल्या व्यवस्थापन अंदाजानुसार क्रियान्वयन करण्याचे प्रस्तावित आहे.
- मान्य निविदाधारक/वाळु ठेकेदार सदर पर्यावरण व्यवस्थापन योजना क्रियान्वयनाचा अनुपालन अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी, तत्सम तहसीलदार यांना सादर करेल.
- जिल्हा खनिकर्म अधिकारी/तत्सम तहसीलदार हा पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या क्रियान्वयनाची वेळोवेळी खात्री करतील व मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला अहवाल वाळु निर्गमीतीच्या धोरणामध्ये सुचविल्याप्रमाणे सादर करतील.

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, लातूर तथा समन्वयक गठीत लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

## जनसुनावणीची नोंद (प्रोसीडींग) :

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्ये | प्रकल्प प्रतिनिधीने दिलेले उत्तर | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना |
|---|---|---|---|
| १. | **श्री. विशाल गाडवे, रा. देउळगाव, ता.परंडा जि. उस्मानाबाद यांनी खालील मुद्दे उपस्थित केले जसे की,**<br>१. ग्रामपंचायत कार्यालय, देउळगावसाठी २५% निधी ताबडतोब देण्यासाठी आपली काय Action आहे. देउळगावला २५% निधी आहे तो अद्याप भेटलेला नाही. गेल्या ५ ते ६ वर्षापासून निधी भेटलेला नाही. त्याच्यावर आपली काय Action होणार आहे?<br>२. याच्या पाठीमागे जो निधी भेटला नाही त्याची काय Action होणार आहे का? | प्रकल्प प्रतिनिधीने असे सुचविले की, दि. २८/०१/२०२२ च्या शासनाने रेती निर्गमीत धारेण जाहीर केले आहे. त्यामध्ये त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयास २५% निधी देण्याच्या संदर्भात त्याच्यात थोडी सुधारणा केली आहे. त्या सुधारणे प्रमाणे जो काही निधी उपलब्ध करून देणार आहेत ते जिल्हा प्रशासन आपल्याला तात्काळ निधी उपलब्ध करून देईल. | मा. जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्ष यांनी असे कळविले की, आपण संचिकेमध्ये बघुन त्याचा Review करू या व आपले जे काही म्हणणे आहे ते ऐकूण आपल्याला व्यवस्थित Responce मिळेल असे सुचविण्यात आले. तसेच, जे नविन आपले धोरण आलेले आहे ते गौण खनिजचे त्याच्यामध्ये निर्देश स्पष्ट आहेत ते आपण दोन प्रकारे करू आताची जी प्रोसेस आहे त्यामध्ये जो निधी दिला जाणार आहे प्रत्येक ग्रामपंचायतीला याची वेगळयाने नोद घेवू व पूर्वीची जी Pendancy जी आहे त्याच्या बद्दल आपण गौण खनिज अधिकाऱ्यांना बैठक घ्यायला सांगू जेणे करून ज्या – ज्या ग्रामपंचायतीचे पैसे देणे बाकी राहिले आहेत त्याची किती रक्कम शिल्लक आहे ती एकत्रीत करता येईल. त्यानुसार परंडा तहसिलदार यांना पुढची कार्यवाही करण्यासाठी आदेशित करता येईल आजच्या बैठकीची निर्देशाप्रमाणे बैठक घेण्याचे निर्देश दिले. |
| २. | **श्री. निशिकांत क्षीरसागर, पत्रकार, आरणा, ता. परंडा, जि. उस्मानाबाद यांनी खालील मुद्दे उपस्थित केले जसे की,**<br>१. गेल्या वर्षी चिंचपूर (बु) या ठिकाणी लिलाव झाला होता त्या ठिकाणी ज्यावेळेस वाळूचे ठेकेदार पावत्या देत | प्रकल्प प्रतिनिधीने असे सुचविले की, या वेळेस आता १००% प्रत्येक हे ऑनलाईन मॉनिटरींग होणार आहे आणि Barcode वाली पावती त्या वाहनधारकाकडे असणार आहे आणि त्याप्रमाणे त्याची मॉनिटरींग होणार आहे. या वेळेस असे पारंपारिक पद्धतीने जे मॅन्युअल पद्धत यावर्षी बंद झाली आहे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाहीत , ३ ते ४ दिवस एकाच पावतीवर वाहतूक करायला लावतात, आणि फक्त रजिस्टरला नोंद करून घेतात. त्या पद्धतीने आणि पुन्हा जर संबंधीत Department नी गाडी पकडली तर त्या वाहतूकदार किंवा मालकांवर कार्यवाही करावी. | महाखनिज ॲपवर रजिस्टर असलेले वाहन हे अधिकृत वाहन म्हणून समजण्यात येतील. तलाठी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांच्याकडे त्यांच मॉनिटरींग असणार आहे आणि ज्या ठिकाणी जी पावती आहे ही बोगस किंवा आढळून आल्यास ती अनिधिकृत आहे असे समजण्यात येईल. | |
| | २. ज्या ठिकाणी वाळूचे उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी उत्खनन करण्या संदर्भाची नियमावली Digital Board वरती लावली तर बरे होईल. | चांगली सुचना आहे आपण म्हणता तसे प्रत्येक तालुक्याच्या तहसिलला आणि शक्य असेल तर ग्रामपंचायतीला ज्या – ज्या ठिकाणी रेती घाट आहेत तेथे अशी सुचना आपण Display करण्यात येईल. | |
| ३. | **श्री. विशाल गाडवे, रा. देउळगाव, ता.परंडा जि. उस्मानाबाद यांनी खालील मुद्दे उपस्थित केले जसे की,**<br>१. त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, ज्या – ज्या ठिकाणी वाळू लिलाव असतात त्या ठिकाणी रस्त्याची खुप दुरवस्था होते रस्ते एकदम उखडलेले आणि ट्रकांनी रस्ते खराब होतात त्या रस्त्याला परत लक्ष देत नाहीत त्यांच्या संदर्भात आपण काय सुचना करणार. | प्रकल्प प्रतिनिधीने असे उत्तर दिले की, आपण शक्यतो ज्या ठिकाणी रेती घाट लिलावात जाणार आहे. त्याला बंधन घालून देणार की त्यांनी ट्रॅक्टरनीच त्या ठिकाणी वाहतूक करायची आहे. मोठे वाहनाचा वापर करायचा नाही आणि त्यामुळे रस्ता खराब होणार नाही आणि काही जे रस्ते खराब झाली आहेत. जो काही गौन खनिज प्रतिष्ठान मधून प्राप्त निधीतून ग्रामपंचायतीने तेच रस्ते दुरूस्त करण्यासाठी सुद्धा प्रस्तावित करावे. | |
| ४. | **श्री. गणेश लांडगे, रा. जाकेपिंपरी, ता. परंडा जि. उस्मानाबाद यांनी विचारलेले मुद्दे,** | प्रकल्प प्रतिनिधीने असे कळविले की, रेती घाट लिलावात अटी व शर्ती घालून देणार आहोत की ते फक्त | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १. रोजगार प्राप्त होईल माणसांना त्याठिकाणी मशिनरीने खुप प्रमाणात वाळू काढली जाते त्याचे काही काटेकोरपणे पालन होईल का. | मॅन्युअल पद्धतीनेच रेती घाटातून उत्खनन करायच आहे आणि असे जर प्रकार निदर्शनास आले तर लिलाव करारनामा रद्द करणार आणि त्यांनी ठेवलेली अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. | |
| ५. | **श्री. निशिकांत क्षीरसागर, पत्रकार, जि. उस्मानाबाद यांनी उपस्थित केलेले मुद्दे,**<br>१. वाळू उत्खननाच्या ठिकाणी ज्या उत्खननापासूनचे रोड आताचे रोडचे कॅमेरे असतील ते एकाच रोड वरती एक कॅमेरा लावला असलात तर त्याच्यात अनेक रस्ते तयार केले जातात ते वाळू उत्खननाच्या परिसरामध्ये बाहेरच्या इतर रस्त्यावरून वाळू बाहेर काढली जाते त्या संदर्भामध्ये विशेष काय उपाय योजना. | प्रकल्प धारकाने असे कळविले की, आपण लिलाव धारकांनी जे रस्ते निश्चित करून Plan मध्ये जे रस्ते निश्चित केले की मोठया रस्त्यापासून आपला घाटापर्यंत रस्ता आहे तोच रस्ता त्यांनी वापरायचा आहे. लिलाव धारकांनी करारनामा करतेवेळी जेव्हा लिलाव होईल त्यावेळेस तहसिलदार Route निश्चित करून देण्यात येईल. | |
| ६. | **श्री. भाउसाहेब बाबासाहेब खरसाडे, रा. तांदुळवाडी, यांनी उपस्थित केलेले मुद्दे,**<br>१. लहान ट्रॅक्टरने आणि मॅन्युअली वाळू काढायची का ? किती टक्के? ग्रामपंचायतला २५% निधी मिळणार का ? त्या डिपॉझीटच्या. | प्रकल्प धारकाने असे कळविले की, मॅन्युअली वाळू मजुरां मार्फतच काढली जाणार आहे. ग्रामपंचायतीला का. नि. दि. २८/०१/२०२२ प्रमाणे निधी अनुज्ञेय असेल. | |
| ७. | **श्री. संदीप गिरी, रा. जगदाळ वाडी यांनी उपस्थित केलेले मुद्दे,**<br>१. आमच्या गावामध्ये जे नदीपात्र आहे आणि रोड | प्रकल्प धारकाने असे सुचविले की, जो टेंडर धारक आहे त्याला वेळ निश्चित करून देणार आहोत. सकाळी ६.०० ते संध्याकाळी ६.०० च्या नंतर जे काही वाहतूक होईल ती | |

| | | | |
|---|---|---|---|
| | आहे गावापासून ते नदीपात्रापर्यंत जे ट्रॅक्टर वगैरे जातात ते रात्रं दिवस चालू राहतील का? त्याची काही नियमावली घालून दिली का? की त्यावेळेस वाळू नेता येईल. | अनाधिकृत असणार आहे. त्याच्यासाठी मॉनिटरींग टीम असणार आहे. तालुका स्तरावर स्थानिक स्तरावर, मंडळ अधिकारी आणि ग्रामपंचायतची पण जबाबदारी आहे. अशी बाब निदर्शनास आल्यास तात्काळ तहसिलदार यांनी अनधिकृत म्हणून त्यांच्यावर कार्यवाही करतील. | |
| | २. जे टेंडर तुम्ही देणार आहोत समजा (जगदाळवाडी) अशा कुठल्याही व्यक्तीला देणार आहात का? जर जगदाळवाडीचा व्यक्ती हा लिलाव घेण्यास उत्सुक असेल तर त्याच व्यक्तीला देणार आहात का ? पात्रता काय आहे लिलाव घेण्यासाठी? | प्रकल्प धारकाने असे कळविले की. पात्रतेचा निकष टेंडरमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. | |

मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनवणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषित केले.

(श्री. स. उ. पाटील)
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, लातूर

(डॉ. प्र. म. जोशी)
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

(श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, भा.प्र.से.)
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद